# मानुषी

प्रतिभा रानडे

रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**मानुषी**
प्रतिभा रानडे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
प्रतिभा रानडे
फ्लॅट नं. २८, गोल्डन गॅलॅक्सी अपार्टमेंट्स,
सोमेश्वर वाडी, बानेर रोड, पुणे- ४११००८
मो. नं. ९२२४६०४३०३

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २७०/-

तीर्थरूप नाना
व
सौ. मावशीस....

# १

तारानं शेवटी रडून, गोंधळ घालून, हट्ट करून, चिरडी नेसवून घेतलीच. तिच्या मामेबहिणीची पहिली मंगळागौर होती आणि त्या दिवशी ताराला परकरपोलक्याऐवजी चिरडी नेसायची होती.

घरात काहीही कार्य असलं की, तिची आई तिला अगोदरच बजावायची, त्याप्रमाणे याही वेळी आईनं ताराला अगोदरच बजावलं होतं, ''तारे, घरात पूजाबीजा व्हायची, चार माणसं यायची. तू कसलाही हट्ट करायचा नाहीस हं, अगोदरच सांगून ठेवते. मला खपायचं नाही ते...''

या सांगण्याचाच ताराला राग आला. ती मनाशीच धुसफुसत म्हणाली, ''मामी सांगते का तिच्या मुलींना असं दरवेळी ? मलाच काय म्हणून दरवेळी दटावणी?'' पण ती उघडपणानं काही बोलली नाही.

आणि मंगळागौरीच्या आदल्या दिवशी, जेव्हा कुणी काय नेसायचं याची चर्चा सुरू झाली तेव्हा मात्र तारानं सूर लावला, 'मी पण चिरडी नेसणार!' तिचं म्हणणं होतं, तिच्या वयाचीच तिची मामेबहीण चिरडी नेसणार होती मग मलाच का नको !

ताराला सगळ्यांनी समजावलं. समजावलं म्हणण्यापेक्षा रागावलेच सगळे तिच्यावर. कधी नव्हे, ती आजीसुद्धा रागावली; पण तिचा हट्ट चालूच होता. आईनं तर दोन रपाटे घातले पाठीत, त्यामुळं तिचं रडणंही सुरू झालं. तिच्या आक्कानं तिला समजावलं, हळू आवाजात ती म्हणाली, ''तारे, कसं कळत नाही ग तुला? असा वेड्यासारखा हट्ट करू नकोस. तुझं परकपोलकं काही वाईट आहे का ? आजी, मामी, आई एवढ्या सांगताहेत तर ऐकत कशी नाहीस तू? आपली आणि मामीच्या मुलींची बरोबरी आहे का ? आठ वर्षांची घोडी झालीस, तुला या साध्या गोष्टी कळू नयेत का ?''

''झालेय् ना आठ वर्षांची घोडी, म्हणूनच मला चिरडी नेसायची.'' तारानं तारस्वरात, ठसक्यातच उत्तर दिलं. ''तुम्हाला हवं तेव्हा मी आठ वर्षांची घोडी

असते. नको असते तेव्हा आठच वर्षांची म्हणून मला काही अक्क्ल नसते. वा ग वा...''

घरातल्या या आरडाओरडीनं वैतागलेल्या मामानं ताराचं शेवटचं वाक्य ऐकलं आणि त्याला हसू आलं. तो म्हणाला, ''आणा ग तिच्यासाठी ती चिरडी. एवढी म्हणतेय् तर नेसू दे.''

पण 'आणा' म्हटलं म्हणजे आठ-बारा आण्यांचा खर्च आला होता. तेवढ्याच पैशात इतर केवढा तरी खर्च करता आला असता; पण ताराचा हट्ट आणि मामाचं 'आणा' म्हणणं, यामुळे तारासाठीही त्या दिवशी चिरडी आणली गेली.

मंगळागौरी दिवशी भल्या पहाटेच अंगधुणी झाल्या झाल्याच तारा आपली चिरडी घेऊन स्वैपाकघरात जाऊन आईसमोर उभी राहिली. स्वैपाकघरातल्या दोन्ही-तिन्ही चुली ढणढणा पेटलेल्या होत्या. वर ठेवलेल्या पातेल्यां-तपेल्यांतून कढ वाहत होते, चुलीतल्या जाळावर पडून तडतडत होते. आई पुरणाचा ढीग पुढ्यात घेऊन पाट्यावर वाटीत बसली होती.

''नेसवून दे मला.'' तारा म्हणाली.

''मी सोवळ्यात आहे, मी काही नेसवणार नाही.'' आलवणाचा पदर सावरीत आई तुटकपणानं म्हणाली.

''नेसव...'' तारा थयथयाट करीत म्हणाली.

''आता जास्त करायला लागलीस ना, तर चुलीतलं लाकूडच घालते पाठीत.'' आई जळजळीत नजरेनं म्हणाली. तारानं हट्टानं चिरडी मिळवली होती ते तिला मुळीच आवडलेलं नव्हतं.

तारा बावरली. आपली आई नेहमीच रागावते हे तिला माहीतच होतं; पण आजचा अवतार वेगळाच होता. ताराच्या आठवणीपासून ताराला आपली आई अशी सतत कामातच असलेली आठवत होती. सकाळी चुलीपुढं, दुपारी निवडणं-टिपणे, दळण-कांडण करताना आणि संध्याकाळी विहिरीवरून पाणी भरताना. आपली आईसुद्धा क्वचित कधी स्वस्थ बसू शकते किंवा रोज रात्री आपल्याला कुशीत घेऊन झोपते हे तिला अगदी अलीकडेच कळलं होतं.

मग तारानं चिरडीचा बोळा काखेत धरला आणि आक्काच्या मागे लागली, ''मला नेसवून दे.'' आक्का तरी काय, तिच्यापेक्षा दोनच वर्षांनी मोठी. ती स्वत:च अगदी अलीकडेच स्वत:ची चिरडी स्वत: नेसायला लागली होती.

तिला काय ताराला नेसवून द्यायला येणार? मग आक्का आणि तारा स्वैपाकघरात आल्या आणि आईच्या देखरेखीखाली ताराची चिरडी नेसून झाली. आपल्या त्या इवल्याशा लुगड्याचा बोंगा दोन्ही गुडघ्यांत दाबून धरत तारानं आईला वाकून नमस्कार केला.

''आपल्या हक्काची भरपूर लुगडी नेसणारी हो ग बाई.'' भरल्या गळ्यानं ताराला आशीर्वाद देत आई म्हणाली, ''आपलं जिणं हे असं अगोदरच परस्वाधीनच आणि तू तुझ्या अशा वगण्यानं ते आणखी लाजिरवाणं करतेस. माणसानं कसं नि:स्पृह असलं पाहिजे, कधी अक्कल येणार तुला कोण जाणे ?'' आलवणाच्या पदरानं डोळे पुसत आई म्हणाली.

बाहेरच्या खोलीत जाणाऱ्या पाठमोऱ्या ताराकडे पाहत आक्का कौतुकानं म्हणाली, ''दिसते कशी ठेपराईची ?''

''पण स्वभाव हा असा. काय नशिबात लिहिलंय हिच्या कुणास ठाऊक?'' आई सुस्कारा सोडून म्हणाली.

''काही काळजी करू नकोस तू. सगळं काही ठीक होईल.'' आक्का मोठेपणानं म्हणाली.

तारा मग दिवसभर आपल्या चिरडीचा बोंगा सावरीत, वावरत होती. आपल्या पोटावरचं निऱ्यांचं केळं कौतुकानं चाचपत होती. तिने खोपा घातला होता. त्यावर चाफ्याचं फूल खोचलं होतं, हातात हिरवा चुडा खुळखुळत होता. कपाळावरच्या बटा कानामागे सारत, हातातल्या बांगड्या सारख्या मागेपुढे करत, गळ्यातली हिरवी दूड कुरवाळत, ती दिवसभर मिरवीत होती. कालचा हट्ट, नंतरची रागवारागवी, ती सगळं काही विसरूनही गेली होती.

संध्याकाळची गौरीची आरती, फराळ आटोपल्यावर मंगळागौरीच्या जागरणाचे खेळ सुरू झाले. फुगड्या, झिम्मा खेळून खेळून मुली दमल्या. जराशा विसावल्या. मामी म्हणाली, ''ए बायांनो, अशा पेंगायला लागू नका हं. रात्रभर जागवायचीये मंगळागौर...चला नावं घ्या बघू.... उखाणे घ्या. नले, तूच घे पहिल्यांदा....'' मामीनं आपल्या मुलीला सांगितलं.

''आमी नाय् बाय्...'' नली लाडावून म्हणाली, ''झाले की ग किती वेळा उखाणे घेऊन...''

''दोनदा म्हजें जास्त झाले का ग? घे...घे...नवऱ्याचं नाव घे... आणखी एकदा घे.'' आजी म्हणाली,

''जा बाई, आम्ही नाही.'' नली पुन्हा लाजून म्हणाली.

''काय पण लाजतेय. तरी बरं, मनात सारखा जप चालूच असेल.'' कोणी तरी म्हणाले.

''अग, नवी नवरी तू, सारखे उखाणे घ्यायला हवेत,'' दुसरी म्हणाली.

आणि मग उखाण्यातून आपापल्या नवऱ्यांची नावं घ्यायचा रंगतदार कार्यक्रम चालू झाला. सर्वांत पहिल्यांदा नलीनं उखाणा घेतला. मग एक एक मुलगी लाजत, मुरकत उखाणे घेऊ लागली. एकेकीचं आटोपता आटोपता शेवटी शेजारच्यांची कुसूम तेवढी राहिली. सकाळी तिनं इतर मुलींबरोबर पूजा, आरती केली होती. इतर मुलींच्या बरोबरीनं मुक्यानं जेवली होती. आताही फुगड्या, झिम्मा खेळली होती; पण हे सगळं तिने उदासपणानं, कर्तव्य म्हणून केलं होतं. दोनच वर्षांपूर्वी तिचं लग्न झालं होतं आणि पाठोपाठ, वयाच्या अकराव्या वर्षीच, नवऱ्यानं, सासरच्यांनी टाकलेली कुसूम माहेरी परत आली होती– पुन्हा नवऱ्याकडे न जाण्यासाठी. तिनं मनोभावानं मंगळागौर पुजली होती, नवरा परत बोलावेल या आशेनं. सकाळीसुद्धा पूजा झाल्यावर मुलींनी नावं घेतली होती तेव्हा तिनं सगळ्यात शेवटी नाव घेतलं होतं आणि आताही तीच शेवटची उरली होती, मोठ्या बायकांचीही नावं घेऊन झाल्यावर.

''घे बाळा, आता तू नाव घे.'' आजी मायाळूपणानं म्हणाली.

कुसूम सावकाशपणानं उठून, पदराचं टोक बोटाला गुंडाळत, भिंतीला टेकून उभी राहिली. नवऱ्याचं फक्त नाव जरी आठवलं, तरी लाजसंकोच वाटण्याचा, भीती वाटण्याचा शाप मिळालेल्या स्त्रीजातीप्रमाणं, कुसूमही नवऱ्याचं नाव घेताना घाबरली, संकोचली. तिच्या नवऱ्यानं तिला टाकून दिलं होतं म्हणून काय झालं ? तो शाप तसाच तिच्या माथ्यावर राहणारच होता. त्याची संगत सुटणारी नव्हती.

कुसूमनं हळू, कापऱ्या आवाजात शेकडो वेळा घेतला गेलेला, गुळगुळीत झालेला उखाणा घेतला.

झाल्या तिन्हीसांजा, इडापिडा टळो,
जनार्दनरावासारखा पती सात जन्म मिळो...

या उखाण्याचा अर्थ तरी तिला कळला होता की नाही कुणास ठाऊक? नवीन लग्न झालं तेव्हा काही उखाणे तिनं पाठ करून ठेवले होते. त्यातलाच हाही एक. आत्ता सहजपणानं आठवला म्हणून घेऊन टाकलान् तिनं. उखाण्यातल्या अर्थाकडे कोण लक्ष देतंय्?

पण तिनं उखाणा घेतला आणि क्षणभर शांतता पसरली. कुसूमच्या आईनं सोडलेला सुस्कारा तेवढा ऐकू आला. बाकी कोणीच काही बोललं नाही. कुसूमसुद्धा, उखाणा घेऊन झाल्यावर त्याचा अर्थ लक्षात आल्यामुळं बावरून गप्प उभी होती; पण ताराला तेवढा पोच कुठला? ती फटकन् म्हणाली, ''कशाला तो नवरा सात जन्मं? प्रत्येक वेळी परत परत टाकून द्यायला?''

ताराचं हे वाक्य पुरं होताहोताच तारावर शिव्याशापांचा वर्षाव सुरू झाला.

''काय बाई अगोचर मुलगी आहे ही?''

''देवानं काही अक्कल दिलेय की नाही?''

''जन्म झाल्यावर वर्षाच्या आत बापाला खाल्लन् आणि आता लग्न झालं की नवऱ्याला खाईल....''

''अवलक्षणी कार्टी... ''

''या पोरीची लक्षणं काही वेगळीच दिसताहेत हो. सांभाळून...''

कोणी काही, कोणी काही बोलत होतं. मामीनं तर कालपासूनचा आपला राग, ताराला भरपूर मार देऊन काढून घेतला.

मामी मारायला लागल्यावर, आईही ताराला धपाटे घालू लागली. तेवढ्यात कुसूमही तीरासारखी धावून गेली तिच्या अंगावर. तिला चापट्या मारत, बोचकारे काढत, केस उपटत म्हणाली, ''मला अपशकुन करतेस ? तुझं कधी बरं व्हायचं नाही. माझ्या नवऱ्यानं तर मला नुसतंच टाकलंय; पण तू विधवा होशील.... विधवा होशील....''

''मी लग्नच करणार नाही.'' तेवढ्या भडिमारात तारानं उत्तर दिलं.

''म्हंजे आमच्या गळ्याशी तात....'' मामी म्हणाली, ''मड्डम होऊन राहणारेस का ?''

तारा मार खात होती; पण तिला रडूच येत नव्हतं. तिला मारता मारता आई मात्र रडत होती.

''काय निर्लज्ज कार्टी आहे बघा. एवढा मार खातेय्, बोलणी खातेय्; पण डोळ्याला टिपूस आहे का बघा. आपलं काही चुकलंय् असं वाटतच नाहीये तिला. केवढी मुजोर मेली.'' मामी थकून जाऊन म्हणाली.

मार खाऊन खाऊन ताराचे केस विस्कटले. हातातल्या बांगड्या वाढवल्या होत्या. डोक्यातलं फूल कुठेतरी जाऊन पडलं होतं. एवढ्या हट्टानं नेसलेली चिरडी सुटायला आली होती. चेहरा संतापानं लाल झाला होता; पण डोळ्यांत

पाण्याचा टिपूस नव्हता. आपलं काय चुकलं तेच तिला कळत नव्हतं; पण एवढा मार खाल्ल्यावर, शिव्याशाप खाल्ल्यावर मात्र तिला एवढं तरी कळूल आलं की, नवरा कसा का असेना, तो कसा का वागेना, त्यानं तुम्हाला अगदी टाकून दिलं तरी तुम्ही मुकाट्यानं गप्प बसायचं असतं. त्याच्यासाठी देवाकडे साकडं घालायचं असतं. त्याच्याबद्दल एवढंसुद्धा वाईटसाईट मनातही आणायचं नसतं, बोलणं तर दूरच. बोललात तर असा मार, असे शाप वाटणीला येतात.

दोन दिवस ताराशी घरातलं कोणीच बोललं नाही. आक्कासुद्धा बोलली नाही. नंतर मग एकदा रात्री झोपताना ताराला जवळ घेऊन, तिच्या अंगावरून हळुवारपणानं हात फिरवीत आई तिला म्हणाली, ''पोरी, काय ग नशिबात लिहिलंय तुझ्या? अशी कशी बुद्धी सुचली तुला, नाही ते विचूक बोलायची ? असलं काही मनात येतं तरी कसं तुझ्या ? आणि आलं तरी ते बोलून दाखवू नये एवढंही कळत नाही का तुला ? कसं व्हायचं तुझं ? लहान नाहीस आता तू. आपलं नशीब आहे फुटकं, लोकाच्या दारात तुकडे मोडतोय आपण. असं वागून कसं चालेल जगामध्ये? जातीसाठी माती खावी लागते. कधी शहाणपण येणार तुला?''

ताराचा जन्म झाल्यावर जेमतेम वर्ष उलटलं आणि तिचे वडील गेले. ताराच्या काकानं एकोणीस वर्षांच्या आपल्या विधवा भावजयीला सोवळी केली आणि तिला तिच्या दोन मुलींबरोबर तिच्या भावाच्या घरी आणून सोडली, पुन्हा परत न नेण्यासाठी. तेव्हापासून आई आपल्या धाकट्या भावाच्या संसारासाठी गुरासारखी राबत होती. ताराला आजोबा नव्हतेच. सोवळी आजी होती. नवऱ्याच्या माघारी तीही आपल्या गरीब मुलाकडे मिंधेपणानं राहत होती. त्यात या तिघींची भर पडली होती. मामा नेहमी वैतागलेला असायचा. मामीची सतत धुसफुस चालू असायची. सोवळी आजी आपल्या सोवळ्या लेकीवर मायेची पाखर घालत होती. आक्का केवढ्यातरी समजूतदारपणानं, प्रौढपणानं वागायची. तारा लहानही होती, शिवाय स्वभाव हा असा हट्टी. आईला तिची फार काळजी वाटायची. ती नेहमी म्हणायची, ''आक्का बघ कशी शहाणी आहे. तूच कशी ग अशी झालीस?''

''हो...मी आहेच वेगळी,'' तारा आडमुठेपणानं म्हणायची.

✦✦✦